VOL. 5 | SPECIAL ISSUE 1| FEBRUARY 2019

ISSN:2454-5503

IMPACT FACTOR: 4.197 (IIJIF)

# CHRONICLE OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES

A Peer Reviewed Bimonthly International Journal

Special Issue on

## CHH. SHIVAJI MAHARAJ AND MARATHA EMPIRE: History, Literature and Contemporary Issues



*Issue Editor*

**Lata Jadhav**

188

Scanned by CamScanner

# CONTENTS


1. Globalization and Rural Women Empowerment in India
**P.T Bachewad** 4

2. United Maharashtra and Bhai Uddavrao Patil
**Dr. Mahesh Vinayk Rote** 6

3. विश्ववंदय छत्रपती शिवाजी महाराज यांचा पर्यावरण विषयक दृष्टीकोन
**प्रा. मोहन काळकुटे** 7

4. आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये भारतीय सार्वजनिक उपक्रमांची बदलती भुमिका
**डॉ. बाळासाहेव निर्मळ** 11

5. मराठाकालीन वतन संस्था
**डॉ.वेंजलवार सुभाष गणपतराव** 15

6. छत्रपती शिवाजी महाराज आणि समकालीनता
**डॉ. समिता जाधव** 18

7. मराठा कालखंडातील स्थापत्यांची समृद्धता
**प्रा.डॉ.पराग दि.साले** 21

8. सचिव येसूबाई
प्रा.डॉ.स्मिता शिंदे 24

9. शिवकालीन सामाज जिवन
**प्रा. शिरसाठ संदिप हरीभाऊ** 27

10. मराठा आरक्षणाची लढाई एक प्रदिर्घ संघर्ष –चिकित्सक अभ्यास
डॉ. सुनंदा एकनाथराव आहेर 31

11. भक्ती पंथातील 'वारकरी संप्रदाय'
**प्रा. सुनिल सुखदेव लोखंडे** 35

12. छत्रपती शिवाजी महाराज आणि मुस्लिम वंश : सलोख्याचे संबंध
सूर्यवंशी बाळासाहेब मधूकरराव 38

13. तंजावरचे व्यंकोजी आणि कलाप्रेमी शहाजी राजे दुसरे
**संजीवनी माडेकर** 41

14. शिवपूर्व कालीन व शिवकालीन बखरींचा तुलनात्मक अभ्यास
प्रतीक राजेंद्र देशपांडे 45

15. मराठा आरक्षण: सर्वांगीण विकास का अंतीम उपाय
**डॉ. ओमप्रज्ञश बंसीलाल झंवर** 48

16. भक्ति आंदोलन और संतकाव्य की सामाजिक चेतना
**डॉ. चित्रा धामजे** 50

17. छत्रपती शिवाजी महाराजांचे निष्ठावंत मुस्लीम सैनिक
**ढास रविंद्र बाबासाहेब** 53




Scanned by CamScanner

5.

# मराठाकालीन वतन संस्था

डॉ.बेंजलवार सुभाष गणपतराव
इतिहास विभागप्रमुख,
महाराष्ट्र महाविद्यालय,निलंगा.

शिवकालीन लोकजीवनात ग्रामजीवनाला अतिशय महत्व होते.ग्राम अथवा गाव हे तत्कालीन सामाजिक,आर्थिक जीवनाचे केंद्रबिंदू होते.शिवाय शिवकालीन प्रशासन व्यवस्थेत ग्राम प्रशासनाला महत्वाचे मानले जाई.गावपातळीवरील समाजजीवनात जातीव्यवस्था,बलुतेदारी,आलुतेदारी या जशा महत्वाच्या संस्था होत्या अगदी त्याप्रमाणेच वतनसंस्था हीसुद्धा तत्कालीन महत्वाची संस्था होती. वतनसंस्था ही एक बहुआयामी संस्था होती. ती समाजजीवनात ज्याप्रमाणे महत्वाची भूमिका बजावत होती, त्याप्रमाणेच ती आर्थिक,राजकीय व प्रशासकीय दृष्टीकोनातून एक महत्वाची संस्था म्हणून ओळखली जात होती. वतनसंस्थेत सत्तेच्या विकेंद्रीकरणाची संकल्पना होतो. स्थानिक प्रश्नांचा निर्णय जिथल्या तिथे व्हावा हाच या पाठीमागचा हेतू असावा. थोडक्यात, गावाच्या स्थैर्यासाठी आणि विकासासाठी सुनियंत्रित अशी वतनदार अथवा वतनसंस्था ही मध्ययुगातील एक महत्वाची संस्था होती.

छत्रपती शिवाजी महाराजांनी साम्राज्य विस्तार करत असताना वतनसंस्था नष्ट करण्यापेक्षा ती अधिक कार्यक्षम करण्याकडे त्यांनी अधिक लक्ष दिले. स्वराज्याच्या विरोधातील वतनदारांची वतने महाराजांनी जप्त केली. परंतु गावपातळीवरचे वतनदार हे शिवाजी महाराजांच्या प्रशासनाचा मुख्य भाग होते.शिवकालीन वतनदारांमध्ये प्रामुख्याने गावपातळीवरील वतनदारांची भूमिका अत्यंत महत्वाची व मोलाची राहिली होती. गावच्या प्रमुख वतनदारांमध्ये पाटील, कुलकर्णी,चौगुला,शेटे-महाजन तर देशमुख, देशपांडे हे परगण्याचे वतनदार म्हणून महत्वाची भूमिका बजावत होते. प्रस्तुत लेखात गावपातळीवरील वतनदारांचाच विचार केलेला आहे.

वतन हा मुळात अरबी भाषेतील शब्द आहे.मध्ययुगीन कालखंडात या शब्दाचा वापर महाराष्ट्रात रूढ झाला. 'सरकारकडून एखाद्या ग्रामाधिका–याला मिळालेली जमिनीची देणगी म्हणजे वतन होय. तत्वत: जोपर्यंत तो ग्रामाधिकारी गावचे काम पाही तोपर्यंत ती जमीन त्याच्याकडे राही पण वस्तुतः जोपर्यंत कुटुंबातील एखादी व्यक्ती प्रामाणिकपणे आणि प्रभावीपणे गावची नोकरी करीत राही तोपर्यंत ती जमीन वंशपरंपरेने त्या कुटुंबातच राही'[1]

गावाची नोकरी करीत असल्यामुळे वतनदारांचे पालनपोषण गाव करीत असे. गावाकडून त्याला रोख अथवा वस्तूच्या स्वरूपात मोबदला मिळत असे. 'रोख दिल्या जाणा-या मोबदल्यास 'नख्त' तर वस्तूच्या स्वरुपातील मोबदल्यास 'गला' असे म्हणत असत. वतनदाराना त्यांचे हक्क त्यांना दिलेल्या सनदेत असल्यामुळे गावकर्यांकडून त्यांची वसुली ते कायदेशीरपणे करून घेत असत. वतनदारांच्या या मोबदल्यास 'हकालजिम' असे म्हणत असत.'[2] ग्राम प्रशासन कार्यक्षमपणे चालविण्यास या ग्रामाधिका-याची अत्यंत गरज भासत असे. त्यामुळे मध्ययुगात राजवटी बदलल्या तरी सहसा वतनदार बदलत नसत. कारण नव्या राजवटीला देखील या वतनदारांच्या सेवेची ग्राम प्रशास्नासाठी तेव्हढीच गरज असे. म्हणूनच प्रामाणिकपणे काम करणारी बरीच वतनदार मंडळी शिवाजी महाराजांच्या काळात देखील सुरक्षित राहिली होती. सारावसुली आणि शेतीचा विकास ही वातनदारांची प्रमुख कर्तव्ये होती. असे असले तरी शेतीशी निगडीत बरीच कामे त्यांना करावी लागत असत.

**पाटील :**

गावचा वंशपरंपरागत अधिकारी पाटील असे. हाच गावचा प्रमुख अधिकारी असे. यालाच ग्रामणी अथवा ग्रामप अशी संज्ञा होती. राज्यव्यवहार कोशात यालाच ग्रामगोपक असे म्हटले आहे. समकालीन कागदपत्रांतून त्याचा उल्लेख गावपाटील, मोकदम,अथवा मोकदम पाटील असा उल्लेख आला आहे. पाटीलकीचा संबंध गावच्या वसाहतीशी असे. काळ्या जमिनीवर जेंव्हा वसाहतीला सुरुवात झाली तेंव्हापासूनच पाटीलकीचा उदय झाला असे म्हटले जाते.'[3] लावणी, संचणी,उगवणी ही पाटलाची प्रमुख कामे समजली जात.

पाटील हा गोतसत्तेचा प्रमुख असे. या गोतसत्तेला वतनदार, बलुतेदार आणि मिरासदार यांचा समावेश असे. गावचा महसूल निश्चित करण्याची कामगिरी राजसत्तेची असली तरी महसूल वसूल करणा-या अधिका-यांना पाटलाची संमती घेतल्याशिवाय किंवा त्यांच्याशी विचारविनिमय केल्याशिवाय अंतिम निर्णय घेता येत नव्हता. पाटील कुलकर्ण्याच्या सहाय्याने प्रतिवर्षी गावाच्या संभाव्य उत्पन्नाचे अंदाजपत्रक तयार करत असे. गोतसत्तेचा तो प्रमुख असल्याने त्या सत्तेच्या सर्व सभांचे संचालन तो करत असे. गावात शांतता व सुरक्षितता प्रस्थापित करण्याची जबाबदारी त्याचीच असे. गावचा पाटील हा प्रामुख्याने मराठा समाजातील असे. परंतु असे असले तरी काही ठिकाणी ब्राह्मण, जैन,लिंगायत अथवा अन्य जातींचे पाटील असल्याची तुरळक उदाहरणे शिवकाळात



Scanned by CamScanner

आढळतात. पाटीलकीच्या सनदेतच पाटलाने उपभोगावयाच्या हकालजीम्यांची नोंद असे. शिवाय गावात विशेष मानपानही मिळत असत. सारांशत: शिवकालीन वतनदारी व्यवस्थेतील पाटील हा एक महत्वाचा वतनदार होता.

**कुलकर्णी :**

गावाचा दुय्यम दर्जाचा अधिकारी आणि पाटलाचा सहायक म्हणून कुलकर्णी ओळखला जाई. 'कागदपत्रातून त्याचा उल्लेख 'गावकुलकर्णी' अथवा 'ग्रामलेखी' असा केला आहे. काही सनदांमधून या वतनदाराचा उल्लेख लेखनवृत्ती असाही केला आहे. थोडक्यात गावातील जमीन किती आहे.त्यच्यावर सरकारी सारा किती आकारला आहे याचा तपशील कुलकर्णी आपल्या दप्तरात ठेवीत असे,'[४] पाटलाप्रमाणेच कुलकर्ण्यानेही गावच्या लावणी-संचनीच्या कामात लक्ष द्यावे व शेती विकासासाठी प्रयत्न करावेत असे कागदपत्रात म्हटले आहे. पाटलाप्रमाणेच प्रत्येक गावात कुलकर्णी वतनदार नसे. कारण तत्कालात कारकुनी काम करण्यास आवश्यक तेवढ्या शिक्षित लोकांचा तुडवडा असावा. किंवा कुलकर्णी वतनदारांची प्रत्येक गावाला आवश्यकता भासत नसावी.त्यामुळे शिवकाळात एकाच कुलकर्णी अनेक खेड्यांचा हिशोबाचे काम पाहत असल्याचे दिसून येते. एखाद्या कुलकर्ण्याकडे अनेक गावे वंशपरंपरेने आली असल्यास आणि त्या सर्व गावांचे काम त्याला एकट्याला झेपत नसल्यास तो आपला हस्तक अथवा मुतालिक एखाद्या गावाला नेमत असे.

मध्ययुगाच्या प्रारंभी कुलकर्णी वतन हे वंशपरंपरागत अथवा शास्वत स्वरूपाचे नसावे, पण काळाच्या ओघात ते तसे बनले असावे. एखाद्या गावाचे कुलकर्णी निर्वंश झाले तर गावकरी तात्पुरता मुतालिक नेमून गावकीचे काम त्याच्याकडून करवून घेत असत. 'कोकणातील काही भागात कुलकर्णी वतन वंशपरंपरागत नव्हते. ई.स.१६५६ मध्ये कोकणचा भाग जिंकल्यानंतर शिवाजी महाराजांनी वतनदार कुलकर्ण्यांची त्या परिसरात नियुक्ती केली.'[५] कुलकर्णी वतनदारांच्या सनदेत हकलाजीम्यांची नोंद केलेली असे. त्यांचे हक्क पाटलासारखे असले तरी त्यांना मिळणारा हकलाजिमा कमी प्रमाणात असे.याशिवाय त्या त्या गावानुसार अनेक वस्तू त्यांना भेट स्वरुपात मिळत असत. ग्रामप्रशासनातील दप्तर नोंदीच्या कामात कुलकर्णी वतनदारही महत्वाची भूमिका बजावत असत.

**चौगुला :**

गावातील किंवा ग्रामप्रशासनाचा चौगुला हा शिवकालीन आणखी एक महत्वाचा वतनदार असे. 'राज्यव्यवहारकोशात त्याला ग्रामणी असे म्हटले आहे. मूळ शब्द चौकुला असा असून त्याचा अर्थ चार कुळे बाळगणारा असा असावा.चौगुला हा गावकीच्या कामामध्ये पाटलाचा सहाय्यक म्हणून काम करीत असावा.'[६] सारावसुलीच्या कामात पाटलाला चौगुलाची भरपूर मदत होत असे. गोतसभेतहीचौगुलाची भूमिका महत्वाची असे. कागदपत्रांमध्ये य-याच ठिकाणी देशचौगुला असाही शब्द आढळतो, हा परगण्याचा वतनदार असावा. काठी ही चौगुल्याची निशाणी होती. म्हणजेच त्याचा संबंध जमीन मोजणीशी असावा.या कामी तो पाटलाला मदत करीत असावा. चौगुला हा सामन्यात: मराठा समाजातील असे. परंतु काही ठिकाणी अन्य समाजातील चौगुल्याचेही उल्लेख आढळतात.

**शेटे-महाजन :**

गाव पातळीवर वतनदार वर्गामध्ये शेटे- महाजन यांचाही समावेश होता. 'गावातील पेठेचा (बाजारपेठ) ते वंशपरंपरागत अधिकारी होत. पेठ ही काही प्रत्येक गावात नसे. परंतु ज्या-ज्या ठिकाणी पेठ असे त्या-त्या ठिकाणी हा शेटे-महाजनांचा वतनदार वर्ग असे. त्यांचे अधिकारही इतर वतनदारांप्रमाणेच परंपरागत होते. गावची वसाहत जशी पाटलाची जबाबदारी तशी पेठेची जबाबदारी शेटेची असे.कुलकर्ण्याप्रमाणे पेठेची अथवा पेठेतील व्यवहाराच्या नोंदी ठेवण्याचे काम शेटे-महाजन करीत असत. पेठेकडून त्यांना वस्तूच्या व रोकड स्वरुपात हक्क मिळत असत. याशिवाय गावात सावकारीचे व्यवहार शेटे-महाजन करीत असत. 'तराजू' ही त्यांची व्यावसायिक निशाणी होती.सरकारी कागदपत्रांवर त्यांच्या नावासमोर तराजूचे चिन्ह असे. याशिवाय गोतसत्तेच्या कामकाजातही ते अधिकृतपणे भाग घेत असत.

पाटील,कुलकर्णी व चौगुल्याप्रमाणेच महार हाही खेडेगावचा वतनदार होता. महारांना गावातील महारकीचे वतन असे. परंतु 'महार हा गाववतनदार असूनही तो गावचा हरकाम्या शिपाई व वेठबिगार होता. पाटील,कुलकर्णी व गावातील शेतकरी यांच्या घरी, शेतात आणि सरकारी दरबारी तो राबत असे.'[७] त्याला त्याच्या कामाच्या बदल्यात बलुते मिळत असे. महार हा जरी गावपातळीवरचा वतनदार असला तरी इतर वतनदारांप्रमाणे त्याच्या वाट्याला फारशे सन्मान आलेले नव्हते.

**देशमुख आणि देशपांडे :**

ग्राम प्रशासनाप्रमाणेच परगण्याच्या प्रशासनात देशमुख-देशपांडे हे वतनदार महत्वाचे होते. 'देशमुख हे परगण्यातील सर्व पाटलांचा नायक (प्रमुख) असे तर देशपांडे देशमूखांप्रमाणेच सर्व कुलकर्ण्यांचा नायक असे. देशमुख वतन हे साधारणता मराठा समाजाकडे असे, अपवादात्मक परिस्थितीत हे वतन ब्राह्मणांच्याकडेही असे. धर्मांतरामुळे काही ठिकाणी या वतनावर मुस्लीम अधिकारीही दिसतात.'[८] आपल्या परगण्यातील पाटलांच्या कामावर देशमुख देखरेख ठेवीत असत. परगण्यातील रयतेची स्थिती जाणून घेण्यासाठी तो आपल्या परगण्यात वार्षिक दौरा काढत असत. सरकार आणि रयत यांना जोडणारा देशमुख हा महत्वाचा दुवा होता. सरकारचे आणि रयतेचे प्रतिनिधित्व देशमुख करत असे. याशिवाय एखाद्या



Scanned by CamScanner

मोहिमेत सरकारला आवश्यकता असेल तर मदतही देशमुखांना करावी लागे.

देशमुख ही संस्था जुनी आहे. मध्ययुगापुर्वी जे परगण्याचा कारभार पाहणारे त्यांना 'विषयपती' असे म्हणत. मध्ययुगात आणि मराठा काळात 'देशमुख'या संज्ञेचा वापर रूढ झाला असावा.ब-याच कागदपत्रांमध्ये बखरीत 'जमीनदार' हा शब्दही देशमुख या अर्थानेच वापरलेला असावा. कर्नाटकात देशमुखांना 'नाडगौडा'आणि कोकणात 'देसाई' अशा संज्ञा वापरलेल्या आहेत. एकंदरीत परगण्याच्या व्यवस्थेत देशमुख या वतनदारांची महत्वाची भूमिका होती.

देशपांडे परगण्यातील कुलकर्ण्यांच्या कामावर देखरेख ठेवण्याचे काम करीत असत. हे देशपांड्यांचे प्रमुख कार्य असल्यामुळेच त्यांना 'देशलेखक' अथवा 'देशकुलकर्णी' असे म्हटले आहे. गावात कुलकर्ण्याचे जे काम तेच परगण्यात देशपांडे करीत असत. परगण्याच्या कामासाठी देशपांडे- देशमुखांना जबाबदार असत. या कामाबद्दल त्यांना सरकारातून वतन मिळत असे. परगण्याचे हिशोब ठेवणे, तपासणे हे त्यांचे मुख्य काम होते. या कामाच्या बदल्यात देशमुख देशपांडे या वातानदाराना सनदेनुसार काही हक्क व त्यांचे हकलाजिमा ठरलेला असे. गावातील वातानदारांच्या तुलनेत अधिकार आणि मिळणारा हकलाजीमाही त्यांना अधिकच असे.

सारांशत: शिवपूर्वकालात गावची ही वतनदार मंडळी इस्लामिक राजवटिंची चाकरी करीत होती. त्या राजवटीत त्यांना बरेच स्वातंत्र्य होते. कारण स्थानिक व्यवहाराचे ज्ञान असलेल्या वतनदारांच्या बळावरच त्यांना सत्ता टिकवायची होती. त्याचा परिणाम वतनदारांची शक्ती बळावण्यात झाला होता. त्या शक्तीच्या बळावर कधी कधी वतनदार गावचा कारभारी म्हणून स्वैर वर्तन करत व मुजोर बनत. अशा वतनदाराना शिवकाळात निशस्त्र करून त्यांना गावकीच्या कामात जुंपण्यात आले.काही लोकांची वतने जप्त करण्यात आली.तर काही लोकांना हक्क बांधून देण्यात आले. सारा वसुलीच्या कामात वतनदार रयतेवर ब-याचदा जुलूम करीत असत. सनदेतील अधिकार दाखवून रयतेकडून अतिरिक्त सारा वसूल करीत. त्यामुळे शिवकाळात त्याचे हक्क बांधून देण्यात आले. वतनदारानी गावचे काम चोख करावे रयतेवर जुलुम-जबरदस्ती, अन्याय करू नये म्हणूनच त्यांचे हक्क बांधून देण्यात आले.

वतन आणि वतनसंस्थेचे महत्व ओळखूनच शिवाजी महाराजांनी ती नष्ट न करता त्यांच्याकडे अधिक लक्ष पुरवले. गावकीची कामे सुरळीत पार पाडण्यासाठी आवश्यक असतील त्या ठिकाणी नवे वतनही निर्माण करण्यात आले. वतन एक सामाजिक सामाजिक संस्था बनली होती. तिची मुळे खोलवर रुजली होती.म्हणूनच शिवाजी महाराजांनी स्वराज्य उभारणीच्या कामात तिचा उपयोग करून घेतला.पुढे छत्रपती राजाराम महाराजांनी याच वतनसंस्थेला नवे स्वरूप देऊन स्वराज्याच्या संरक्षण कार्यात वतनदारी संस्थेच्या मोठ्या प्रमाणात उपयोग करवून घेतला.त्यामुळे शिवकालीन वतनदार ही संस्था अत्यंत महत्वाची संस्था ठरते.

**संदर्भ व संदर्भ ग्रंथ :**


१) कुलकर्णी अ.रा.,शिवकालीन महाराष्ट्र,राजहंस प्रकाशन,पुणे,२००९,पृ.०५

२) उपरोक्त.

३) कठारे अनिल व घोडके जयश्री, शिवकालीन महाराष्ट्र, अल्फा पब्लिकेशन, नांदेड,२०१८, पृ.२७.

४) कुलकर्णी अ.रा.,शिवकालीन महाराष्ट्र,राजहंस प्रकाशन,पुणे,२००९,

५) कुलकर्णी अ.रा.,शिवकालीन महाराष्ट्र,राजहंस प्रकाशन,पुणे,२००९,

६) कुलकर्णी अ.रा.,शिवकालीन महाराष्ट्र,राजहंस प्रकाशन,पुणे,२००९,

७) कठारे अनिल व घोडके जयश्री, शिवकालीन महाराष्ट्र, अल्फा पब्लिकेशन, नांदेड,२०१८, पृ.२७.

८) कुलकर्णी अ.रा.,शिवकालीन महाराष्ट्र,राजहंस प्रकाशन,पुणे,२००९,पृ.०५

९) आत्रे त्रि.ना., गाव-गाडा, समन्वय प्रकाशन कोल्हापूर,२०१२.

१०) भावे वा.कृ., पेशवेकालीन महाराष्ट्र, वरदा प्रकाशन,पुणे,१९९८.

११) कुलकर्णी अ.रा.,मराठ्यांचा इतिहास,कॉनटीनेंटल प्रकाशन,पुणे,२००९,


□□□



190

Scanned by CamScanner